CCE-II-RR/PR/NSR/NSPR(B)/999/8005

**B**

**ಜೂನ್ 2024 ರ ಪರೀಕ್ಷೆ - 2**
**JUNE 2024 EXAMINATION - 2**

ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 12 ]

Total No. of Printed Pages : 12 ]

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 45 ]

Total No. of Questions : 45 ]

**CCE RR/PR/ NSR/NSPR**
**Reduced Syllabus**

Question Paper Serial No.

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M**
**Code No. : 08-M**

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ
## Subject : First Language — MARATHI

**(ಶಾಲಾ ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಖಾಸಗಿ ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಎನ್.ಎಸ್.ಆರ್. / ಎನ್.ಎಸ್.ಪಿ.ಆರ್.)**
**(Regular Repeater / Private Repeater / NSR / NSPR)**

ದಿನಾಂಕ : 14. 06. 2024 ] [ Date : 14. 06. 2024

ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 10-15 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1-30 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-15 A.M. to 1-30 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 ] [ Max. Marks : 100

**विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :**

**Cut here/ಇಲ್ಲಿ ಕತ್ತರಿಸಿ**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये एकूण 45 प्रश्न आहेत.
2. प्रश्नपत्रिका ही विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती प्रश्नपत्रिका उघडावयाची आहे. **(बाणाने दर्शविलेल्या ठिकाणातून प्रश्नपत्रिका कापून उघडा.)** डाव्या बाजूने कापून प्रश्नपत्रिका उघडू नका. प्रश्नपत्रिकेमधील सर्व प्रश्न असलेली पाने व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पहा.
3. प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या ही त्या प्रश्नाचे पूर्ण गुण दर्शविते.
5. प्रश्नांची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्नपत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे समाविष्ट करण्यात आलेली आहेत.
6. तुम्हाला देण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकेची आवृत्ती (version) आणि तुमच्या प्रवेशपत्रावर छापलेल्या प्रश्नपत्रिकेची आवृत्ती (version) दोन्ही एकच आहेत. याची खात्री करुन घ्या.

येथून कापा.

**14. 06. 2024**

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
**प्रश्नपत्रिका येथून कापून उघडा.**

**Tear here**

**I. पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा :** **6 × 1 = 6**

1. 'निः + अक्षर' याची संधी अशी होते

(अ) निक्षर (ब) नक्षर

(क) निरक्षर (ड) निरक्ष

2. 'बाबा गावाहून आले.' अधोरेखित शब्दाची विभक्ती ही आहे

(अ) पंचमी (ब) तृतीया

(क) संबोधन (ड) षष्ठी

3. ''राणी बागेत फिरत होती.'' या वाक्यात हा काळ आहे

(अ) अपूर्ण वर्तमानकाळ (ब) पूर्ण भूतकाळ

(क) अपूर्ण भूतकाळ (ड) भविष्यकाळ

4. कर्त्याच्या लिंग, वचन, पुरुषाप्रमाणे क्रियापदाचे रूप बदलते तेव्हा हा प्रयोग होतो

(अ) कर्मणी प्रयोग (ब) भावे प्रयोग

(क) कर्तरी प्रयोग (ड) यापैकी नाही

5. ''नावडतीचे मीठ .............'' म्हण पूर्ण करा

(अ) कडू (ब) खारट

(क) आंबट (ड) अळणी

6. 'आठवड्यातून एकदा प्रसिद्ध होणारे' ................

(अ) दैनिक (ब) साप्ताहिक

(क) नियतकालिक (ड) वार्षिक

**II. पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा :**

**4 × 1 = 4**

7. क्षणाक्षणाला : अव्ययीभाव :: राजवाडा : ..................

8. भारत : नाम :: अबब ! : ..................

9. चंद्र : सुधांशू :: धरित्री : ..................

10. ज्ञान : अज्ञान :: स्तुती : ..................

**III. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :** **7 × 1 = 7**

11. बोक्याने आपली एकादशी कशी मोडली ?

12. काकूंचा आकांत पाहून शेजारीपाजारी धावून का आले ?

13. सावित्रीबाईंचे लग्न कोणाशी झाले ?

14. रूक्मिणीने कोणास विन्मुख पाठवले नाही ?

15. रूक्मिणीने पती म्हणून कोणास वरले आहे ?

16. संत तुकडोजी यांचे पूर्ण नाव लिहा.

17. सत्कार कवितेचे मूल्य लिहा.

**IV. खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा :** **3 × 2 = 6**

18. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

(अ) कोंडमारा होणे

(ब) हेटाळणी करणे.

19. अलंकार ओळखून लक्षणे लिहा.

“चल ऊठ रे मुकुंदा, झाली पहाट झाली,

बाहेर चांदण्याला हलकेच जाग आली.”

20. गण पाडून वृत्त ओळखा.

युगामागुनी चालली रे युगे ही

**V. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा :** **7 × 2 = 14**

21. डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांचा परिचय लिहा.

22. मुलांनी 'आजीबाई' म्हणून हाक मारताच काकू रागाने काय म्हणाल्या ?

23. ''म्या तरी गुत्तं घेतलंय का ?'' संदर्भासह अर्थ स्पष्ट करा.

24. गंगूबाईनी आपल्या गुरुंना कोणती गुरुदक्षिणा दिली ?

25. विरहिणी म्हणजे काय ? तुमच्या पाठ्यपुस्तकातील विरहिणीचे नाव लिहा.

26. श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठी रूक्मिणीने काय-काय प्रयत्न केले आहेत ?

27. विंदा करंदीकर यांचा थोडक्यात परिचय लिहा.

**VI. खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा :** **1 × 3 = 3**

28. (अ) सुख पाहता जवापाडे / दुःख पर्वताएवढे.

**किंवा**

(ब) अति तेथे माती.

**VII. खालील प्रश्नांची उत्तरे पाच–सहा वाक्यात लिहा :** **10 × 3 = 30**

29. आंधळ्यांनी हत्तीचे वर्णन आपल्या शब्दात कसे केले आहे ?

30. विद्येसाठी आंबेडकरांनी कोणकोणते कष्ट सोसले ?

31. टोकियोमधील क्लब पार्टीचे वर्णन करा.

32. 'मदर्स युनियन' संस्थेची माहिती लिहा.

33. गंगुबाईंनी कोणकोणत्या देशात आपल्या गाण्याची कीर्ती पसरविली ? त्यांना कोणकोणते पुरस्कार व उपाधी देण्यात आल्या ?

34. धर्माच्या नावाखाली ढोंगी गुरु काय–काय करतात ?

35. पहाटेच्या वेळी बाळ्या आचंबित का झाला ?

36. देशातील सकलास मानवता कळू दे असे कवी का म्हणत आहे ?

37. कवितेतील स्त्री काय बांधत आहे ? ते बांधत असताना तिने कोणते कष्ट सोसले ?

38. 'पाठ आणि पोट यांचा झाला टाळ' कवितेचा सारांश लिहा.

**VIII. खालील प्रश्नांची उत्तरे आठ–दहा वाक्यात लिहा :** **4 × 4 = 16**

39. शेवटी गणातात्यांनी कोणता निर्धार व्यक्त केला ? का ?

40. सावित्रीबाई खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी कशा होत्या ते तुमच्या शब्दात लिहा.

**किंवा**

पतीच्या मृत्युनंतर त्यांच्या कोणकोणत्या आठवणीनी सावित्रीबाईंना हुंदके येत होते ?

41. हिरव्या तृणपात्याचा सत्कार कुणी कुणी, कसा व का केला ?

**किंवा**

'सत्कार' या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात थोडक्यात लिहा.

42. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा :

या भारतात ................................

............................. ...............

.............................................

............................. वा हो इस्लामी.

**किंवा**

सकलास.....................................

..........................................

..........................................

.................................... हो आम्ही.

**IX. खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :**

**1 × 4 = 4**

43. आपल्या कामाची आखणी करणे, किती वेळात काय संपेल त्याचे नियोजन करणे आणि ठरविल्याप्रमाणे काम पार पाडण्याचा प्रयत्न करणे म्हणजे वक्तशीरपणा होय. औद्योगिकरण आणि शहरीकरण यामुळे आता तर जीवन खूप गतिमान व गुंतागुंतीचे बनले आहे. त्यामुळे सध्याच्या युगात वक्तशीरपणाला पर्याय नाही. वेळेत कामे पार पाडली नाहीत. तर आपण फक्त आपलेच नुकसान करतो असे नव्हे तर आपल्याबरोबर आपण इतरांचेही नुकसान करतो. म्हणून आपल्या कामाचे

नियोजन करा. ती वेळच्या वेळी पार पाडण्याचा कसोशीने प्रयत्न करायला हवा. हाच 'वक्तशीरपणा' होय. वक्तशीरपणा न पाळणे म्हणजे स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेणे होय.

**प्रश्न :**

(अ) वक्तशीरपणा म्हणजे काय ? 2

(ब) कामाचे नियोजन का करावे ? 2

**X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा :** **1 × 5 = 5**

44. आरोग्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी लहान भावास मार्गदर्शन करणारे पत्र लिहा.

**किंवा**

सतत खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे अभ्यासात व्यत्यय येत आहे. त्यासाठी हेस्कॉमच्या अधिकाऱ्यास तंक्रार अर्ज लिहा.

**XI. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंध लेखन करा :**

**1 × 5 = 5**

45. (अ) माझी आवडती महान स्त्री.

**किंवा**

(ब) पाणी टंचाई व त्यावरील उपाययोजना.

DO NOT WRITE ANYTHING HERE